साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०५ ऑगस्ट २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवास प्रारंभ!

## यंदा श्रावणाची सुरूवात सोमवारी; ७१ वर्षानंतर आला योग; पाच श्रावणी सोमवार






परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- देशभरातील पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ओळख असलेल्या येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवास सोमवार (दि.५) पासून सुरूवात होत असून या उत्सवाची येथे तयारी पूर्ण झाली आहे.

यंदा राज्यात सर्वत्र चांगला पाऊस झाल्याने व समाधानाचे वातावरण असल्याने भाविक मोठ्या संख्येने श्रावणात येथे 'श्री' च्या दर्शनाला येतील असे चित्र आहे. यंदा श्रावणाची सुरुवात सोमवारी होत आहे तर पाच श्रावणी सोमवार आले आहेत. असा योग ७१ वर्षानंतर जुळून आला आहे. यापूर्वी १९५३ साली श्रावणाची सुरूवात सोमवारी झाली होती. पाच श्रावणी सोमवार आल्याने शिवभक्तांना सोमवारी 'श्री'ची विशेष अभिषेक, पूजा करण्याचा दुर्मिळ योग आला आहे. दरम्यान, १८ वर्षानंतर पाच श्रावणी सोमवार आले आहेत. २००६ ला असा योग आला होता तर २०२३ ला अधिक श्रावणामुळे ८ श्रावणी सोमवार आले होते.

### ना.धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट...

पालकमंत्री व कृषीमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने श्रावणमास उत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या महिन्यातील पाचही श्रावण सोमवारी मंदिराचा मुख्य गाभारा तसेच मुख्य मंदिर फुलांनी सजवले जाणार आहे. तर दर सोमवारी भाविकांना मंदिर परिसरात शाबुदाण्याची खिचडी, राजगिरा लाडूचे वाटप केले जाणार आहे. अशी माहिती प्रतिष्ठानचे सचिव नितीन कुलकर्णी यांनी दिली.

श्रावण मास उत्सवाची येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिरात तयारी पूर्ण झाली आहे. दर्शनासाठी स्त्री, पुरूष अशा वेगवेगळया रांगा करण्यात आल्या आहेत. शंभर रुपये देणगी देवून विशेष दर्शनाची व्यवस्था मंदिरात केली गेली आहे. यासाठी वेगळी रांग मंदिरात आहे. पहाटे श्रीची काकडा आरती, अभिषेक पूजा होवून दर्शनाला सुरूवात होते. रात्री उशिरापर्यंत मंदिरात भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असतात. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेने दर्शन रांगेच्या मार्गावर मंडप टाकले आहेत, पिण्याच्या पाण्याची सोयही केली आहे, पावसात भाविक भिजू नयेत म्हणूनही काळजी घेतली गेली आहे, दर्शन व्यवस्था चोख व्हावी म्हणून जागोजाग शंभरावर सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, पार्कींगचीही व्यवस्था मंदिर परिसरात केली गेली आहे. दर्शन व्यवस्था चोख व्हावी व भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेचे जेष्ठ विश्वस्त राजेश देशमुख, प्रा.बाबा देशमुख यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

दरम्यान, श्रावण मास उत्सवात मंदिरात चोख पोलिस बंदोबस्त असणार आहे. यासाठी जागोजाग पोलीस तैनात करण्यात आले आहेत. सोमवारी अधिक बंदोबस्त मंदिर व परिसरात असणार आहे. श्रावण महिन्यात श्रावणी सोमवारसह महिनाभर येथे शिवभक्तांची मोठी रेलचेल असणार आहे. शहर व परिसरातील यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध शिव मंदिरांसह इतर मंदिरात असे कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत.

दरम्यान, परळीत मोठा दमदार पाऊस न झाल्याने वैद्यनाथ मंदिर परिसरातील हरिहर तीर्थात पुरेसा जलसाठा झाला नाही. त्यामुळे श्रावणात शिवभक्तांना हरिहर तीर्थ स्नान करणे अवघड होणार आहे. ***



### मेरु प्रदक्षिणा घालणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार दूर...

श्रावणात येथे मंदिर परिसरातील मेरुपर्वताला प्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे. मेरुपर्वत परिसरातील रस्त्याचे सिमेंट मध्ये बांधकाम केले गेल्यामुळे भाविकांची यंदा गैरसोय दूर झाली आहे. यामुळे भाविकांना मेरु प्रदक्षिणा करणे सुलभ होणार आहे. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नामुळे या रस्त्याचे काम झाले आहे.



## यंदाचा निम्मा पावसाळा व सरासरीच्या निम्मा पाऊस होऊनही

# परळीत तलाव भरले मात्र तीर्थे कोरडीच!

परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- परळी तालुक्यातील काही लघू, मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात यंदा झालेल्या पावसामुळे परळी शहरास पाणी पुरवठा केला जाणारा तालुक्यातील नागापूर येथील 'वाण' मध्यम प्रकल्प तुडूंब भरला आहे. इतरही प्रकल्पात पाणी साठा झाला आहे, परंतु परळी शहरात मोठे, मुसळधार पाऊस न झाल्याने वैद्यनाथ मंदिर परिसरातील विविध तीर्थे कोरडी आहेत.

मंदिर परिसरातील तीर्थे कोरडी असल्याने यंदा पवित्र श्रावणात व श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या सध्या सुरू झालेल्या श्रावणमास उत्सवात भाविकांना तीर्थस्नानाला मुकावे लागणार आहे. यंदाचा निम्मा पावसाळा व निम्मा पाऊस होऊनही परळीतील प्रसिद्ध हरिहर तीर्थ, मार्कण्डेय तीर्थ कोरडी आहेत. यंदा परळी तालुक्यात जूनच्या प्रारंभीच म्हणजे वेळेवर पावसाला सुरूवात झाली. जून अखेर पर्यंत सुमारे दीडशे मिलिमीटर पाऊस येथे झाला. पेरणी योग्य पाऊस झाल्याने मृगनक्षत्रात तसेच त्यानंतर शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्या केल्या. जून अखेर व जुलैच्या प्रारंभी पर्यंत तालुक्यात पेरणीचे काम पूर्ण झाले. यंदा तालुक्यात वेळेवर पेरण्या झाल्या. जून, जुलै या महिन्यात सतत पडत गेलेल्या रिमझीम व हलक्या मध्यम सरीच्या पावसामुळे खरिपाची पीके तालुक्यात चांगली बहरली आहेत. परळी तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान साडेसातशे ते आठशे मिलिमीटर आहे. निम्मा पावसाळा झाला आहे. तालुक्यात चार ऑगस्ट पर्यंत वार्षिक सरासरीच्या निम्म्यावर म्हणजे चारशे १७ मिलिमीटर पाऊस झाला आहे. गेल्या वर्षी पूर्ण पावसाळाभर केवळ ३७० मिलिमीटर पाऊस झाला होता. यंदा मात्र चांगला पाऊस आहे.

गेल्या दोन महिन्याच्या पावसाळ्यात परळीत मोठे, दमदार व मुसळधार पाऊस बरसले नाहीत. त्यामुळे परळीतील मंदिर परिसरातील विविध तीर्थे कोरडी आहेत. तसेच परिसरातील काही लघू, मध्यम प्रकल्पातही पुरेसा जलसाठा झालेला नाही. परंतु परळी शहरास पाणी पुरवठा होणाऱ्या तालुक्यातील नागापूर येथील 'वाण' प्रकल्पाच्या अंबाजोगाई, धारुर तालुक्याच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्याने गेल्या शुक्रवारी (ता.२)

(उर्वरित पान ३ वर)

# श्री वैद्यनाथ मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील अतिक्रमणे काढून रस्ते मोकळे करा!





परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानच्या श्रावणमास उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील अतिक्रमणे हटऊन रस्ते मोकळे करा व भाविकांची गैरसोय दूर करा अशी मागणी येथे होत आहे.

सोमवार (ता.५) पासून श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानचा श्रावणमास उत्सव सुरू होत आहे. शिवप्रभूच्या दर्शनासाठी या उत्सवात राज्यासह देशभरातून लाखोच्या संख्येने येथे शिवभक्त येतात. श्री वैद्यनाथ मंदिराकडे शहरातून जाणाऱ्या विविध मार्गावर जागोजागी अतिक्रमणे आहेत. शिवाय ट्रक, ट्रॅक्टर यांसह इतर अवजड वहाने तसेच छोटी मोठी वहाने, फेरीवाल्यांचे गाडे भर रस्त्यावर उभी असतात. बांधकाम साहित्यही ठिकठिकाणी पडलेले आहे. रस्त्यावर कचऱ्याचे ढिग, अस्वच्छता आहे. यामुळे भाविकांसह येथील सर्वसामान्य नागरिकांची, वहान चालकांची गैरसोय होते आहे. परळी पालिका, पोलिस प्रशासन व इतर संबंधितांनी लक्ष घालून ही गैरसोय दूर करावी अशी मागणी नागरिकांतून होते आहे. दरम्यान, मुख्य मार्गावर रस्त्यात वहाने उभी करणाऱ्यावर व बांधकाम साहित्य टाकणाऱ्यावर प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी आहे.

परळी परिसरातील औष्णिक वीज केंद्रातून विटभट्ट्यांसाठी नेल्या जाणाऱ्या राखेची वहातूक सध्या मोठ्या प्रमाणात आहे. राखेच्या अनेक वहांनावर ताडपत्री, प्लास्टीक झाकले जात नाही. यामुळे रस्त्यावर राखेचे प्रदूषण होते आहे. याकडेही संबंधितांनी लक्ष घालावे अशी मागणी आहे.

श्रावण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य चौकात, रस्त्यावर वहातुकीची कोंडी टाळण्यासाठी वहातूक पोलिस नेमण्याचीही मागणी आहे. रस्त्यावरील फेरीवाले, फळे, इतर वस्तुचे विक्रेते रस्त्यावरच आपली वहाने उभी करतात. त्यामुळे वहातुकीस, रहदारीस अडथळा येतो, या प्रकरणीही पोलिसांनी लक्ष घालून नागरिकांची गैरसोय दूर करावी. दरम्यान, राखेचे टँकर व इतर जड वहाने टोकवाडी, जिरेवाडी, कन्हेरवाडी परिसरातून जाणाऱ्या नव्या वळण रस्त्यावरुन सोडली जावीत, यामुळे शहरातील वहातुकीची कोंडी टाळण्यास मदत होईल असे नागरिकांचे म्हणणे आहे.*

# परळी ते कपिलधार बस सेवा पूर्ववत करावी - महादेव ईटके

परळी वैजनाथ (बातमीदार):- श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथून कपिलधार येथील बससेवा पूर्ववत करावी या मागणीसाठी आज एस टी महामंडळाचे परळी आगार प्रमुख यांना निवेदन देण्यात आले.

या बाबतीत अधिक माहिती अशी की, श्रावण महिन्याची सुरुवात सोमवार ४ ऑगस्ट पासून होत आहे. श्रावणमासा निमित्ताने परळी येथून श्रीक्षेत्र मन्मथस्वामी कपिलधार येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याच बरोबर एक निसर्गरम्य ठिकाण व पावसाळ्यात सुरू होणारा प्रसिद्ध धबधबा पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात कपिलधार येथे जात असतात. मागील श्रावण महिन्यात परळी येथून कपिलधार ला जाणारी बस भाविकांच्या आग्रहास्तव सुरू करण्यात आली होती. या बसला उत्तम प्रतिसाद भाविकांकडून मिळाला होता. परंतु ही बससेवा खंडित




केल्याने भाविकात नाराजी निर्माण झाली होती. याची दखल घेत महाराष्ट्र वीरशेव सभेचे तालुका अध्यक्ष महादेव इटके, मुद्रा लोन समिती बीड जिल्हा सदस्य सुशील हरंगुळे, परळी शिवसेना उपशहर प्रमुख सचिन स्वामी, प्रसिद्ध व्यापारी नागेश खानापुरे, शिवकुमार चौंडे, अमोल बुरकुल, पवन तोडकरी यांच्या शिष्टमंडळाने गुरुवार १ ऑगस्ट रोजी परळी आगार प्रमुख सिद्धार्थ सोनवणे यांना परळी ते कपिलधार बससेवा पूर्ववत करावी यासाठी निवेदन दिले. आगार प्रमुखांनी ही बससेवा पूर्ववत करण्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले आहे. ***

# विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच खेळालाही तेवढेच महत्व दिले पाहिजे-सुभाष नानेकर

## नवीन प्राथमिक शाळेत 'दप्तराविना शाळा' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना खेळाचे प्रशिक्षण





परळी वैजनाथ, (बातमीदार):- शरीर, मन व बुद्धीच्या विकासासाठी मैदाणी खेळ आवश्यक असून शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच खेळालाही तेवढेच महत्व दिले पाहिजे, विद्यार्थ्यांनी मैदानावर येवून खेळ खेळले पाहिजे असे प्रतिपादन ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुभाषराव नानेकर यांनी केले.

येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.३) 'दप्तराविना शाळा' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध खेळ यांसह चालणे, धावणे, वळणे आदींचे प्रशिक्षण श्री नानेकर यांनी दिले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, ज्येष्ठ शिक्षक उमेश देशमुख, एल.आय.वाकडे यांच्यासह विनोद देशमुख, भागवत मुंडे, श्री निरडे, श्री चौरे, श्रीरामे, आर. आर. जाधव, आर.पी.गादेकर, आर.पी.निटुरे, सौ.गंगणे, नागेंद्र जाधव, शुभम जगताप, सौ.सुरवसे यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक श्री निरडे यांनी केले. भागवत मुंडे यांनी उपक्रमाविषयी माहिती दिली. यावेळी मुख्याध्यापक श्री शिंदे यांनी संस्थेने सुरू केलेल्या दप्तराविना शाळा या उपक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पालकही उपक्रमाचे कौतुक करत असल्याचे सांगितले. दरम्यान, शाळेच्या वतीने श्री नानेकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून मुख्याध्यापक श्री शिंदे यांनी सत्कार केला. श्री नानेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात खेळ खेळावेत, मैदानातच आदर्श नागरिक घडत असतात, असे सांगून खेळातील बारकावे, तंत्र समजून घेतले पाहिजे, मन लावून खेळ खेळला पाहिजे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. शाळेच्या मैदानावर श्री नानेकर यांनी विविध खेळाचे तसेच चालणे, धावणे, वळणे, कदमताल अशा विविध कवायतीसह शारिरिक कसरतीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. विद्यार्थ्यांकडून कृती करुन घेतली. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. ***

संपादकीय...

# चला यात्रेला...!

**सुविचार :–** केलेले उपकार, दिलेला शब्द आणि उपयोगी पडलेली माणसं कधीही विसरायची नसतात.

सर्वसामान्यांसाठी सरकार विविध योजना आणत असते. या योजनेचा लाभ हजारो नागरिक घेत असतात. सध्या राज्यात सरकारने आणलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' मोठी चर्चेत आहे. महिलांना आरोग्य, पोषण, स्वावलंबनासाठी ही योजना सरकारने सुरू केली आहे. या योजनेतून महिलांना दर महिन्याला दीड हजार रुपये सरकार देणार आहे. या योजनेचा लाभ मिळावा म्हणून गेल्या काही दिवसांपासून अर्ज भरण्यासाठी महिला पुढे आल्या आहेत. अर्ज भरण्याच्या केंद्रावर दररोज हजारो अर्ज भरले जात आहेत. राज्यात आतापर्यंत लाखो अर्ज या योजनेसाठी दाखल झाले आहेत. एकट्या बीड जिल्ह्यात आतापर्यंत तीन लाख ४५ हजारावर महिलांनी लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज दाखल केले आहेत. सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, कार्यकर्ते असे कितीतरी जण महिलांकडून अर्ज भरण्यासाठी पुढे आले आहेत. त्यामुळे अर्जाची संख्या वाढत आहे. या योजनेतून अर्ज दाखल केलेल्या महिलांना येत्या राखी पौर्णिमेदरम्यान पहिला हप्ता मिळणार आहे. यासाठी प्रशासनाची मोठी धावपळ सध्या सुरू आहे. या योजनेचा पहिला हप्ता कधी हाती पडतो याची उत्सुकता अर्ज दाखल केलेल्या महिलांना आहे.

या योजनेबरोबरच राज्य सरकारने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' ही अभिनव योजना आणली आहे. या योजनेचीही सध्या महाराष्ट्रात जोरदार चर्चा होत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठीही हजारो नागरिक पुढे सरसावले आहेत. राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी ही योजना आहे. या ज्येष्ठांना राज्यासह देशातील महत्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी ही योजना आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उतारवयात तीर्थ यात्रा करु न शकणाऱ्या व इतर ज्येष्ठांनाही योजना मोठी फायद्याची आहे. आयुष्यात महत्वाच्या मोठ्या तीर्थक्षेत्री जाऊन दर्शन घ्यावे अशी अनेकांची इच्छा असते. ही इच्छा आता सरकारच्या माध्यमातून या योजनेतून पूर्ण होणार आहे. या योजनेसाठी ज्येष्ठांना आपले अर्ज पोर्टल, मोबाईल ॲप, सेतू सुविधा केंद्रातून भरता येतात. ऑनलाईन अर्ज भरता न आल्यास सेतू सुविधा केंद्रावर जाऊन आपला अर्ज देता येईल. या योजनेसाठी निवड झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना प्रवास खर्चाची मर्यादा तीस हजार रुपयापर्यंत आहे. यात तीर्थस्थळापर्यंतचा जाण्या-येण्याचा प्रवास खर्च, निवास, भोजन खर्चाचा समावेश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिक हा महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे व त्याचे वय ६० व त्यावर असले पाहिजे. वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त नसावे, तसेच ती व्यक्ती शारिरिकदृष्ट्या सक्षम, निरोगी असावी. अशा साध्या अटी यासाठी आहेत. अर्ज मोफत भरत येतो. अर्जाबरोबर रेशन कार्ड, आधार कार्ड, आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. ज्या ज्येष्ठ नागरिकांचे वय ७५ वर्षे व त्यापेक्षा अधीक असेल त्यांना यात्रेला सोबत एकाला नेता येणार आहे. महाराष्ट्रातील ज्योतिर्लिंगासह देवीची शक्तीपीठे व इतर मोठ्या तीर्थक्षेत्राची दर्शन यात्रा करता येईल. यासाठी राज्यातील ६६ तीर्थक्षेत्राची निवड सरकारने केली आहे. तर देशभरातील महत्वाच्या ७३ तीर्थक्षेत्राचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. ही योजना हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौध्द आदी विविध धर्मियांसाठी असल्याने सर्वानाच आपल्या तीर्थक्षेत्राचे दर्शन घेता येणार आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. यासाठी अर्जही भरण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेमुळे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना राज्यासह देशातील महत्वाच्या तीर्थस्थळाचे दर्शन घेण्याची इच्छा व स्वप्न पूर्ण होणार आहे. ज्येष्ठांनो आता भरा अर्ज आणि चला यात्रेला! सरकारने आणलेल्या या अभिनव योजनेचा घ्या लाभ!

दरम्यान, राज्य शासनाने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री युवा अप्रेंटिसीप योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, महात्मा फुले जनआरोग्य योजना, मुलींना पदवीपर्यंत मोफत शिक्षण योजना तसेच सध्या सुरू होत असलेल्या श्रावणानिमित्त 'श्रावणात एसटीसंगे तीर्थाटन' अशा नाविण्यपूर्ण योजनेमुळे सरकारच्या कामगिरीचे लोक कौतुक व अभिनंदन करत आहेत. ही योजना सर्वसामान्यापर्यंत व गरजू पर्यंत जायला हवी, यासाठी लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची लूट व गैरसोय होऊ नये, खऱ्या गरजवंतांपर्यंत ही योजना गेली पाहिजे, याची काळजी घेतली जावी असे वाटते. ***

# मानवमुक्तीचे शिलेदार : अण्णाभाऊ साठे

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक होते. शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास होता. कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. त्यांची १ ऑगस्टला जयंती त्यानिमित्ताने...**

अनेक नामवंत साहित्यिकांच्या वाट्याला त्यांच्या हयातीत उपेक्षाच आली. जशी महात्मा जोतीराव फुले यांच्या वाङ्मयाची त्यांच्या काळात उपेक्षा झाली, तशीच उपेक्षा अण्णाभाऊ साठे यांचीही झाली. अण्णाभाऊंचे साहित्य रूपवादी, रंजनपर, परधार्जिणे आणि भडक आहे, ते साहित्यबाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे अशी टीका झाली. मराठी 'कादंबरीचे शतक' लिहिणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी तर कोण हे अण्णाभाऊ साठे? असा प्रश्न केला होता. होय अण्णाभाऊ सामाजिक बांधिलकी मानणारे, समाजपरिवर्तनाचे शस्त्र हाती घेऊन लेखन करणारे साहित्यिक होते. कम्युनिस्ट चळवळीशी त्यांचा जवळून संबंध होता. पण सर्वसामान्य कष्टकरी, दलित, उपेक्षित आणि धर्मव्यवस्थेने हक्क नाकारलेले स्त्री-पुरुष हे त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी होते. समीक्षकांना त्यांचे साहित्य प्रचारकी, रंजनपर वाटले असेल, पण हजारो वाचकांनी त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची अक्षरश: पुन:पुन्हा पारायणे केली. त्यांच्या साहित्यातून प्रगट झालेली त्यांची सर्वसामान्य माणसांविषयीची आंतरिक तळमळ व त्यांच्या सुखदु:खाचे चित्रण करण्याची ओढ वाचकांच्या मनाला भुरळ घालत असेल. वाचनीयता हे तर त्यांच्या साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होतेच, पण त्याचबरोबर मराठी मनाचा आणि महाराष्ट्रीय सांस्कृतिक विशेषांचा अत्यंत मनोज्ञ आविष्कार त्यांच्या कथा-कादंबऱ्यादी सर्वच लेखनातून समृद्ध स्वरूपात झालेला असल्याने, त्यांच्या साहित्याला वाचकांची अधिक पसंती असेल.


*'मुंबई नगरी ग बडी बाका।*
*जशी रावणाची दुसरी लंका।।*
*वाजतो ग डंका - डंका चहूमूलकी।*
*राहयाला गुलाबाचे फूल की।।'*

या शब्दांत पठ्ठे बापूराव मुंबई मायानगरीचे वर्णन करतात. तर याच मुंबई नगरीचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात-

'मुंबईत उंचावरी। मलबार हिल इंद्रपुरी।।
कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती।।
परळात राहणारे। रात दिवस राबणारे
मिळेल ते खाऊन घाम गाळती।।

पठ्ठे बापूरावांना मुंबई गर्भश्रीमंत दिसते, तर अण्णाभाऊंना तीच मुंबई विषम व्यवस्थेचे प्रतीक वाटते. अण्णाभाऊंच्या वेगळ्या जीवनदृष्टीचा येथे प्रत्यय येतो. 'ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तोलली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर उभी आहे' अशी त्यांची विज्ञाननिष्ठ भूमिका होती. 'जग बदल घालुनि घाव, असं सांगून गेले मला भीमराव' अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांची निष्ठा होती. अण्णाभाऊंचे सारेच लेखन उपेक्षितांच्या बाजूचे आणि त्यांच्या अटीतटीच्या जगण्यातील संघर्षाचे व अनुभवविश्वाचे प्रखर वास्तव अधोरेखित करणारे आहे.

अत्यंत शौर्यवान, स्वामिनिष्ठ, प्रामाणिक, धैर्यशील, नीडर आणि कलंदर कसबी कलावंताच्या मांग जातीत १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव जि. सांगली येथे अण्णाभाऊंचा जन्म झाला होता आणि १८ जुलै १९६९ रोजी मुंबईच्या चिरागनगरीच्या झोपडपट्टीत अत्यंत हलाखीच्या अवस्थेत त्यांचा मृत्यू झाला. शाळेची पायरीदेखील न चढलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी ३७ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, ११ पोवाडे, ३ नाटके, शेकडो गाणी, लावण्या, छकडी अशी विपुल साहित्यसंपदा निर्माण केली आहे; ही



खरोखरी अचंबित करणारी गोष्ट आहे. त्यांनी त्यांच्या लहान वयात वाटेगावच्या परिसरातील पाटील-कुलकर्ण्यांच्या बेमुर्वतखोर वागण्याचा, त्यांच्या अत्याचाराच्या आणि चांगुलपणाचाही अनुभव घेतला होता, त्यासंबंधीच्या अनेक अनुभवकथा तेथील जाणत्या लोकांकडून ऐकलेल्या होत्या. इंग्रजी अधिकाऱ्यांच्या अमानुष अत्याचाराच्या विरोधात बेरड-मांग-रामोशांनी दिलेल्या लढ्याच्या कथा-गाथा त्यांच्या सतत कानावर पडत होत्या. त्यातल्या अनेक गोष्टी त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिल्या होत्या. वाटेगावच्या परिसरातील पाण्याने तुडुंब भरून वाहणाऱ्या नद्या आणि नद्यांच्या काठांवरचा समृद्ध हिरवागार संपन्न निसर्ग त्यांनी डोळ्यांत साठवून ठेवला होता. ग्रामदेवतांच्या यात्रा-खेत्रातील उत्सवी वातावरणात त्यांचे बालपण गेले होते. जत्रेत अनेक वाद्ये वाजवण्यापासून दांडपट्ट्यासारखे मर्दानी खेळ त्यांनी सवंगड्यांसह खेळले होते. अवती-भोवतीच्या आयाबायांच्या तोंडची गाणी, ओव्या, गोष्टी-आख्यायिकांचा ठसा त्यांच्या कोवळ्या मनावर कोरला गेला होता. पातिव्रत्य धर्माचे पालन करणाऱ्या अनेक स्त्रिया त्यांच्या भोवताली वावरत होत्या. त्या निष्ठावान स्त्रियांचे राजरोस होणारे शोषण त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते आणि त्याविषयीचा संताप व चीड त्यांच्या मनात धुमसत असावी. पुढे मुंबईला गेल्यानंतर तेथील झोपडपट्टीतील उघडेवाघडे जगणे, त्यांच्या जगण्यातील भयाण वास्तव त्यांनी पाहिले. त्यांचा भूकेकंगालपणा आणि भुकेची आग शांत करण्यासाठी त्यांची होणारी ससेहोलपट, अवैध मार्गाचा अवलंब या साऱ्या गोष्टी त्यांनी जवळून अनुभवल्या आणि ते विदारक आणि अद्भुत वास्तव त्यांनी साहित्यातून मांडले. शिक्षणापेक्षा अनुभव हाच मोठा गुरू असतो या गोष्टीची अनुभूती त्यांचे साहित्य वाचताना येते. अण्णाभाऊ साठे यांच्य लेखनात अद्भुतता, अतिशयोक्ती, अतार्किकता आहे, पण त्यात तेवढेच नाही; त्यातून जीवनातील विदारक वास्तवही प्रगट झाले आहे. लोककथेतील अद्भुतता, अतिशयोक्ती मानवी मनाला भुरळ घालते. पण त्यातून प्रगट झालेले जीवनातील तत्त्वज्ञान व वास्तवाचे दर्शन त्या मनाला अंतर्मुख करून विचार करायला लावते. रंजन करता करता व्यापक जीवनदर्शन घडविण्याचे सामर्थ्य लोककथेत असते. लोकपरंपरेतील मौखिक साहित्याचे वैशिष्ट्य अण्णाभाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून कलात्मक रूप घेऊन आविष्कृत झालेले आहे. या संदर्भात त्यांची 'स्मशानातील सोनं' ही कथा लक्षात घेता येईल. गाव सोडून मुंबईला पोट भरण्यासाठी गेलेला भीमा दगडाच्या खाणीत काम करीत असतो. पण ती खाण अचानक बंद होते. उपाशी असलेला भीमा स्मशानातून-प्रेतातून सोने शोधण्याचे काम सुरू करतो आणि एका रात्री भीमा पुरलेले प्रेत उकरत असताना कोल्ही-लांडग्यांचा प्रेतावर हल्ला होतो. भीमा आणि त्या हिंस्र प्राण्यात झुंज सुरू होते, त्या झुंजीचे अद्भुत चित्रण अण्णाभाऊ करतात. त्या झटापटीत प्रेताच्या जबड्यात भीमाचा हात अडकून त्यांच्या हाताची बोटे तुटतात. आता बंद पडलेल्या खाणीचे काम सुरू होते, पण काम करणाऱ्या भीमाच्या हाताला बोटे नसतात. पोट जाळण्यासाठी भीमाने केलेल्या घनघोर लढाईचे वर्णन अण्णाभाऊंनी समर्थपणे केले आहे. भुकेच्या तीव्रतेचे भयानक दारिद्र्याचे वास्तव कथेत आहे. अशा प्रकारच्या अनेक कथांमध्ये अद्भुत आणि वास्तव एकाचवेळी अवतरते. हे अण्णाभाऊंनी मौखिक साहित्याच्या परिचयातून आत्मसात केले आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी ज्या काळात लेखनाला सुरुवात केली, त्यावेळी वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके वाङ्मयविश्वाच्या यशशिखरावर आरूढ झालेले होते. ना. सी. फडके यांच्या लेखनाने प्रेमाची स्वप्नचित्रे रेखाटून तरुण-तरुणींची मने काबीज केली होती आणि वि. स. खांडेकरांनी देशप्रेमाच्या आणि ध्येयवादाच्या स्वप्नाळू दुनियेत तरुण पिढीला गुंतवून त्यांना आकर्षित केले होते. अण्णाभाऊ साठे, या दोन्ही लेखकांनी उभा केलेला वाङ्मयीन माहोल बाजूला सारून स्वत:चा एक नवा रस्ता निर्माण करीत होते. 'मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही', अशी त्यांची लेखनामागील भूमिका होती. 'माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसे फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती फार महान आहे, त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज आणि त्यांचं यश यावर माझा विश्वास आहे', असे त्यांचे मत होते. त्यामुळेच त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी तीच माणसे आहेत. अण्णाभाऊ साठे

(उर्वरित पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०८ * अंक १३ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०५ ऑगस्ट २०२४ * किंमत : २ रू.

(पान १ वरुन)...

## मानवमुक्तीचे शिलेदार : अण्णाभाऊ साठे

यांच्या चित्रणाविषयी डॉ. बाबुराव गुरव यांनी सविस्तर लिहिले आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसवलेला सांगली, सातारा, कोल्हापूरचा परिसर, कृष्णा, कोयना, वारणा, वांग, वेरळा, पंचगंगा या नद्यांकाठचा समृद्ध निसर्ग, त्या प्रदेशातील ग्रामीण संस्कृती, ब्रिटिश काळातील जीवन, दाट जंगल झाडी, डोंगरवाटा, त्यांच्या आश्रयाने सुरू असणाऱ्या क्रांतिकारकांच्या चळवळी, गुंड-दरोडेखोरांच्या दंगली, गावातील भाऊबंदकी, दोन गावांमध्ये पिढ्यान् पिढ्या चालत आलेले वैर, त्यात भरडला जाणारा अस्पृश्य समाज, खून, मारामाऱ्या, तरण्याताठ्या देखण्या पोरीबाळींवर होणारे अत्याचार या साऱ्या गोष्टी अण्णाभाऊ आपल्या साहित्यात मांडत होते. सण-उत्सव, जत्राखेत्रा, बैलगाड्यांच्या शर्यती, कुस्त्यांचे फड, तमाशे, वाघ्या-मुरळींची जागरणे, त्यांचे धनदांडग्यांकडून होणारे शोषण, खेड्यापाड्यातील माणसांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, शेती, शेतकऱ्यांचे एकमेकांवरील प्रेम, सहकार्य, नातेसंबंधातील जिव्हाळा, श्रेष्ठकनिष्ठतेचा भाव, शेतीमध्ये होणारा बदल, पिठाच्या गिरण्या, विहिरीवरील इंजिन, हळूहळू कोसळणारा गावगाडा, बलुतेदाराची स्थितीगती, सावकारशाही, श्रीमंतीच्या जोरावर चालणारा इष्काचा बाजार, गरती स्त्रियांची घराण्याच्या प्रतिष्ठेपोटी होत असणारी घुसमट, देशाच्या स्वातंत्र्याची आच, स्त्रीचे शील, घराण्याचा बडेजावपणा, मोठे दगडी चौसोपी वाडे, महारवाडा, मांगवाडा, भटके-फिरस्ते अशा साऱ्या गोष्टींचे त्यांच्या बारीक-सारीक तपशिलांसह केलेले चित्रण अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आले आहे. त्यामुळेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे आपल्या भूमीशी घट्ट नाते आहे. परिसराशी जोडलेले असणाऱ्या ह्या साहित्याला आपोआपच व्यापक वैश्विक आयाम प्राप्त झालेला दिसतो. भारतीय भाषांमध्ये त्यांचे साहित्य अनुवादित झालेच, पण धर्मजातीच्या, देशकालाच्या सीमा ओलांडून ते जर्मन, झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन, स्लोव्हाक या परकीय भाषांमध्ये भाषांतरित झाले. ही अण्णाभाऊंच्या साहित्याचे विलोभनीय यश मानावे लागेल. अण्णाभाऊ साठे मार्क्सवादी आहेत. त्यांच्या साहित्यातून आधीपासूनच समतावादी विचारांचा आविष्कार दिसत असला तरी मुंबईला गेल्यावर श्रीपाद अमृत डांगे यांच्या सान्निध्यात ते आले आणि त्यांची मार्क्सवादी जाणीव अधिक पक्की झाली. मुंबईतील कामगार जीवन, त्यांचे वर्गसंघर्षाचे तत्त्वज्ञान, तेथील संप, मोर्चे, त्यांच्या रोजीरोटीचा सवाल, कामगारांच्या चळवळीतील फाटाफूट या साऱ्या अनुभवातून अण्णाभाऊंच्या विचारांना पाठबळ मिळत गेले. मुंबईच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांचे जीवनचित्रण करताना त्यांच्यातील मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आविष्कार प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. अण्णाभाऊ साठे लेखक तर होतेच, त्यापेक्षा शाहीर म्हणून ते अधिक लोकप्रिय होते. ते स्वतः गायक-नट होते. त्यांनी १९४२ मध्ये स्टॅलिनग्राडचा पोवाडा लिहिला. त्या पोवाड्याने कम्युनिस्ट पार्टीच्या वर्तुळात कम्युनिस्ट शाहीर म्हणून प्रसिद्ध झाले. शाहीर अमर शेख, द. न. गव्हाणकर यांच्या सहकार्याने 'लाल बावटा' कलापथक काढले. त्यांच्या मार्क्सवादी भूमिकेचा सर्वाधिक आविष्कार पोवाड्यांमधून व लोकनाट्यातून झाला आहे. लाल बावट्याच्या माध्यमातून वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान आणि साम्यवादी विचार त्यांनी महाराष्ट्रात रुजवला. स्वातंत्र्यलढा, गोवा मुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यामधील अण्णाभाऊंचे योगदान मोलाचे होते. 'माझी मैना गावाकडे राहिली' या त्यांच्या छकडीने सारा महाराष्ट्र निनादून सोडला होता. आजही त्या लावणीची जादू ओसरलेली नाही. तमाशाबंदीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी अण्णाभाऊंनी 'लोकनाट्य' ही संज्ञा वापरली आणि अकलेची गोष्ट, खापऱ्या चोर, देशभक्त घोटाळे, शेटजीचे इलेक्शन, माझी मुंबई इत्यादी लोकनाट्ये लिहून तो शब्द रूढ केला. या लोकनाट्यातून आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न त्यांनी मांडले. भांडवलदार, शेतकऱ्यांचे शोषण करणारे सावकार, शेटजीभटजी हे त्यांच्या टीकेचे लक्ष्य होते. 'धोंड्या' नावाचे एक पात्र निर्माण करून अक्षरशः पुंजापतींच्या वृत्तीप्रवृत्तींवर दगड भिरकावले. प्रबोधन करून परिवर्तन घडविले. वर्गयुद्ध घडविले, सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य मराठी माणसांना दिले. कलानंदाचा आनंद देण्याबरोबरच मराठी मनावर संस्कार केले. मार्क्सवादी विचारांची पेरणी केली. अण्णाभाऊ साठे मानवतावादी लेखक होते. शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास होता. केवळ महाराष्ट्र नव्हे तर साऱ्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. वर्गविरहित समाजाचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे ध्येयवादी लोकशाहीर होते. मानवमुक्तीचे शिलेदार होते!

– प्रा.विश्वनाथ शिंदे, पुणे.

(पान १ वरुन)...

## परळीत तलाव भरले मात्र तीर्थे कोरडीच!

वाण प्रकल्प भरुन ओसंडून वाहू लागला आहे. १९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठवण्याची क्षमता असलेला हा प्रकल्प भरल्यामुळे परळीकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता दूर झाली आहे. शिवाय प्रकल्पाच्या परिसरातील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची, सिंचनाची सोय झाली आहे. या प्रकल्पाबरोबरच तालुक्यातील नंदनज-सारडगाव परिसरातील बोरणा मध्यम प्रकल्प भरत आला आहे. बोधेगाव, मोहा प्रकल्पातही चांगला पाणीसाठा झाला आहे.

परळीतील विविध पौराणिक तीर्थे, परिसरातील चांदापूर, दैठणा, कन्हेरवाडी, खोडवा सावरगाव आदी ठिकाणची छोटे, मोठे तलाव भरण्यासाठी मोठ्या, मुसळधार पावसाची आवश्यकता आहे. दरम्यान, परळी शहरास सध्या आठवड्यातून एक वेळा पाणी पुरवठा होतो. वाण प्रकल्प भरल्याने दोन ते तीन दिवसांनी परळी पालिकेने शहरास पाणीपुरवठा करावा अशी मागणी येथील नागरिकांची आहे. ****




## कडा येथे अन्न व औषध आणि पोलीस प्रशासनाने पकडली भेसळ दुधाची चोरी; जिल्हाधिकाऱ्यांनी केली कारवाई

बीड (जिमाका) : बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामधील कडा येथे एका गोदामात भेसळयुक्त दूध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या १३३६८ किलो चा साठा धाड टाकून जप्त करण्यात आला आहे. या मालाची किंमत ११ लाख ८५ हजार ०६८ रूपये होती.

ही कारवाई जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनात, तसेच छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशाने राबविण्यात आली. मागील तीन दिवसांपासून याबाबत गोपनीय पद्धतीने मोहीम राबविण्यात आली होती.या अंतर्गत बीड, अहमदनगर आणि धाराशिव येथे आज पहाटे धाड टाकून कार्यवाही करण्यात आली आहे. बीड-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील साईदत्त एंटरप्रायजेस नावाचे दुकान जवळच पत्र्याचे शेडमध्ये असलेल्या गोदामात भेसळयुक्त दुध तयार करण्यात येत होते. या ठिकाणी दूध तयार करण्यासाठी १३३६८किलो भेसळ जप्त झाले. हे काम बऱ्याच दिवसापासून सुरू असल्याचे धाड टाकताना लक्षात आले. ही धाड अन्न सुरक्षा प्रशासन व पोलिसांनी जिल्हाधिकारी श्री पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सकाळी केली. या धाडीमध्ये एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अंबादास पांडुरंग चौधरी यांचे हे गोदाम होते.

गोपनिय माहितीच्या आधारे अन्न अन्न व नागरी पुरवठा आणि पोलीस प्रशासनाने रविवारी पहाटे या ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त



दुधाची निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला. ६ लाख ८७ हजार ६७२रुपयांची पोटॅशियम हायड्रॉक्साइड फ्लेक्स, कॉस्टिक पोटॅशियम फ्लेक्स, ट्राय सोडियम सिक्रेट, कॉस्टिक सोडा फ्लेक्स ही भेसळ ६,९४२ किलो सापडली. गोदामात अंबादास पांडुरंग चौधरी यांना अनुराधा भोसले यांनी सांगितले भेसळकारी अन्न पदार्थांचा वापर हा संकलित केलेल्या दुधामध्ये वापर करीत असल्याचे कबुली दिली. संबधित गोदामाला अन्न व औषध प्रशासन श्री देवरे आणि श्री कांबळे यांनी पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आली. ही सर्व कार्यवाही अन्न सुरक्षा अधिकारी सं. कृ. कांबळे, विक्रांत हिंगे, सहायक पोलिस निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून ही कार्यवाही केली. ***

## श्री ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी...

श्रावणमास विशेष

**देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ख्याती असलेल्या परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवाला सुरूवात झाली आहे. आज (दि.०५) पहिल्या श्रावणी सोमवार निमित्ताने...**



**धार्मिक महत्व**– कांतीपूरी, वैजयंतीक्षेत्र, जयंतीक्षेत्र, पर्यली ही आजच्या परळी वैजनाथची प्राचीन नावे. बालाघाट डोंगररांगांच्या कुशीत हे गाव वसले आहे. जगाच्या उध्दारासाठी भारतभूमीत शिवलिंग अवतरले. वायूच्या संघर्षाने या ज्योतिर्मय स्वरूपाचे बारा भाग होऊन ते इतस्तत: विखुरले. तीच आज प्रसिध्द असलेली ज्योतिर्लिंगे होत. असा उल्लेख ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीविषयी परळी माहात्म्य या प्राचीन ग्रंथात आहे. शिवाचा अवतार असलेला वैद्यनाथ हा चित्ताभूमीत रावणाकरिता प्रकट झाला. तोच परळीचा वैद्यनाथ. अशी पौराणिक कथा या स्थानाबद्दल सांगितली जाते. समुद्रमंथनाच्या वेळी धन्वंतरी वैद्यराज व अमृत ही रत्ने निघाली. अमृत पिण्यासाठी राक्षस धावले, तेव्हा भगवान विष्णूने अमृतासह धन्वंतरीला शंकराच्या पिंडीत गुप्त केले, त्यामुळे या लिंगाला अमृतेश्वर किंवा वैद्यनाथ हे नाव मिळाले, अशी कथाही सांगितली जाते. या शिवपीठाचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे शंकराचा निवास सहकुटुंबीय आहे. येथे येणाऱ्या शिवभक्तांना बाराही ज्योतिर्लिंगाचेही दर्शन घडते. काशीपेक्षाही अधिक महत्व या स्थानाला असल्याचे येथे मानले जाते. त्यामुळे परळीकरांना काशी यात्रा वर्ज्य आहे. शालिवाहन शके १७०६ चैत्र शुध्द पंचमी शुक्रवार रोजी आहिल्यादेवी होळकर यांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केल्याची नोंद आहे. ऐसपैस पायऱ्या, प्रशस्त आवार व रमणीय परिसर हे या मंदिराचे वैशिष्ट्ये आहेत. मंदिराभोवती हरिहर, अमृतकुपी, मार्कंडेय ही चिरेबंदी बांधकामे असलेली भव्य तिर्थेआहेत. या मंदिराचे बांधकाम हेमांडपंथी आहे. मंदिर शिखरावर विविध मुर्ती आहेत. त्यात मल्हारराव होळकरांचा अश्वारूढ पुतळाही आहे. मुख्य मंदिराला पाच प्रवेशद्वार आहेत.पुर्वेकडील दरवाजा महाद्वार म्हणून ओळखला जातो. हा भव्य दगडी, कोरीव काम असलेला भक्कम दरवाजा आहे. या महाद्वारावर त्रिकाल चौघड्यांची हजेरी असते. या प्रवेशद्वारातून आत आल्यावर सागवानी लाकडाचा मंडप आहे. या मंडपाखाली नंदीच्या तीन मुर्ती आहेत. शिवभक्तांना येथे आपल्या हाताने श्री ची पूजा करण्याची मुभा आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात श्री गणेश व मराठमोळ्या वेशात पार्वतीचे दर्शन होते. गुढीपाडवा, श्रावणमास, अधिकमास, पौषमास, कार्तिकमास, मकरसंक्रांत, दसरा, दिवाळी या दिवशी विविध धार्मिक उत्सव असतात. महाशिवरात्रीला वार्षिक यात्रा उत्सव असतो.

**निवासाची सोय**– वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टने भाविकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात विविध भक्त निवास उभारले आहेत. या भक्त निवासस्थानातील खोल्यांना शंभर, दीडशे, दोनशे, आडीचशे रूपये प्रमाणे भाडे आकारले आहे. भक्तनिवासात मोठ्या हॉलचीही सोय आहे. शिवाय शहरात विविध खासगी लॉज आहेत. मंदिराच्या भक्त निवास स्थानातील भक्त निवासाची रूम मिळण्यासाठी मंदिर कार्यालयाचा संपर्क क्रमांक-०२४४६-२२२९०९. **बसने येण्याचा मार्ग** – औरंगाबाद-बीड-परळी अंतर २४०, नांदेड-गंगाखेड-परळी अंत ११०, पुणे-नगर-परळी ३४०, पुणे-इंदापूर-बार्शी-परळी ३६०, मुंबई-चाकन-नगर-परळी ५२०, लातूर-परळी ६५ किलोमीटर असे अंतर आहे. **परळीत येण्यासाठी रेल्वे सुविधा**– औरंगाबाद-परभणी-परळी, नांदेड-परभणी-परळी, हैदराबाद-लातूर रोड रोड-परळी, मिरज-पंढरपूर-परळी, बेंगलोर-परळी, हैदराबाद, सिकंदराबाद-परळी, कोल्हापूर-परळी-नागपूर, पुणे-लातूर-परळी, मुंबई-लातूर, सिकंदराबाद-परळी-काकीनाडा, परळी-परभणी-पुर्णा-आकोला अशा रेल्वे गाड्यांची सोय येथे आहे.

**– लक्ष्मण वाकडे** (पत्रकार),
परळी वैजनाथ.